सकाळ

# शैक्षणिक वर्ष विस्कळित

## कोरोनामुळे परीक्षा, निकाल आणि प्रवेशाचा उडणार गोंधळ

सकाळ वृत्तसेवा

मुंबई, ता. २५ : कोरोनामुळे देशभरात लॉकडाऊन घोषित झाल्याने राज्यातील सीईटी परीक्षा आणि विद्यापीठांच्या परीक्षा लांबणीवर गेल्या आहेत. यामुळे सीईटी परीक्षा, निकाल आणि नवीन वर्षाच्या प्रवेशाचा गोंधळ उडणार आहे. यामुळे २०२०-२१ हे शैक्षणिक वर्ष विस्कळित होणार आहे.

कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे देशभरात १५ एप्रिलपर्यंत लॉकडाऊनची घोषणा पंतप्रधानांनी केली आहे. यामुळे सीईटी सेलने एमएचटी-सीईटी परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला आहे. या परीक्षेला राज्यभरातून तब्बल पाच लाखांहून अधिक विद्यार्थी बसणार आहेत. ही परीक्षा लांबणीवर गेल्याने प्रथम वर्ष व्यावसायिक अभ्यासक्रमाचे वेळापत्रक कोलमडणार आहे. अभियांत्रिकी, कृषी, एमबीए, विधी अशा विविध अभ्यासक्रमांची प्रवेश परीक्षा लांबणीवर जाणार असल्याने याचे निकाल आणि अभ्यासक्रमाची प्रवेश सुरू होण्यास मे जून महिना उजाडण्याची शक्यता आहे. यामुळे व्यावसायिक अभ्यासक्रमाचे प्रवेश सुरू होण्यास जुलै महिना लागू शकतो. यामुळे या अभ्यासक्रमाचे शैक्षणिक वर्ष लांबणार आहे.

राज्य सरकारने शाळा-महाविद्यालये बंद करण्याचा निर्णय घेतल्यानंतर पाठोपाठ राज्यातील सर्व विद्यापीठांच्या परीक्षा ३१ मार्चपर्यंत पुढे ढकलण्यात आल्या होत्या. आता पुन्हा पंतप्रधानांनी १४ एप्रिलपर्यंत लॉकडाऊनची घोषणा केल्याने विद्यापीठाची परीक्षाही पुढे गेली आहे. कोरोनाची परिस्थिती



संग्रहित छायाचित्र.

नियंत्रणात न आल्यास आणखी निर्बंध येऊ शकतात. यामुळे विद्यापीठ परीक्षांचे वेळापत्रक तयार करत नाही. विद्यापीठाच्या परीक्षा सुमारे दोन महिने चालतात. परीक्षांनंतर निकाल जाहीर होण्यास दीड महिन्याचा कालावधी लागतो.

त्यामुळे यंदा विद्यापीठांच्या परीक्षा आणि निकालाचा मोठा गोंधळ उडणार आहे. याचा परिणाम प्रवेश प्रक्रियेवर होणार आहे. यातून आगामी शैक्षणिक वर्ष विस्कळित होण्याचा अंदाज शिक्षण क्षेत्रातील अभ्यासकांकडून व्यक्त होत आहे.

करोनाची धास्ती वाढत असली तरी नागरिकांनी संयमाने व धैर्याने तोंड दिल्यास त्यावर मात करणे अशक्य नाही. त्यासाठी प्रत्येकाने आपली जबाबदारी ओळखून सरकार सांगत आहे त्याप्रमाणे घरात थांबण्याची नितांत आवश्यकता आहे. घराबाहेर राहून स्वत:चे व घरच्यांचे आयुष्य धोक्यात घालण्यापेक्षा घरी थांबून योग्य त्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याची गरज कोल्हापुरातील लोकप्रतिनिधी तसेच जबाबदार अधिकारी व्यक्त करत आहेत. सर्वांनी स्वत: काळजी घेतली असून, ही लढाई जिंकण्यासाठी साऱ्यांचीच ताकद आवश्यक आहे.



सरकारने कॉलेज, शाळा बंद केल्या आहेत. त्यामुळे विद्यार्थी, शिक्षक तसेच सर्वच शिक्षण क्षेत्रातील घटकांनी आता घरातच राहणे आवश्यक आहे. सरकारने दिलेल्या सूचनांचे तंतोतंत पालन केले पाहिजे. मुख्यमंत्र्यांनी हे अदृश्य शत्रूविरोधातील युद्ध असल्याचे सांगितले असल्याने त्यामध्ये जिंकण्यासाठी घरी राहून प्रत्येकाने योग्य त्या नियमांची अंमलबजावणी केली पाहिजे.

– डॉ. देवानंद शिंदे, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ